**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, राज्यपाल सी पी राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून देशवासियांना गुढीपाडव्या शुभेच्छा

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी मन की बात द्वारे आकाशवाणीवरुन देशवासियांना संबोधित करणार

- छत्तीसगडमध्ये झालेल्या चकमकीत ११ महिलांसह १७ नक्षलवादी ठार

**आणि**

- म्यानमार आणि थायलंडमध्ये झालेल्या भूकंपातल्या मृतांची संख्या १ हजाराच्या वर, जगभरातून मदतीचा ओघ सुरू

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. चैत्र शुक्लदी, उगादी, चेट्टीचंद, नवरेह, चेराओबा या सणांनिमित्त देखील त्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. भारतीय नववर्षाची सुरुवात असलेले हे सण भारताची सांस्कृतिक विविधता दर्शवतात आणि सामाजिक एकता वाढवतात असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनीही गुढीपाडव्यानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर येत असलेला हा पहिला गुढी पाडवा सर्वांनी उत्साहाने साजरा करावा असं त्यांनी म्हटलं.

राष्ट्रधर्माचा वसा घेऊन राज्याच्या, देशाच्या विकासाचा एकजुटीने निर्धार करूया. हा राष्ट्रधर्म वाढवू या, विकासाची महागुढी उभारू या, असे आवाहन करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातल्या नागरिकांना गुढीपाडव्याच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या आहेत. हे नववर्ष नागरिकांच्या जीवनात धनधान्य, पशुधनाची समृध्दी आणि भरभराट घेऊन येवो, निसर्गाची कृपा घेऊन येवो, अशी प्रार्थनाही मुख्यमंत्र्यांनी केली आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या नागपुरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या गुढीपाडव्यानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. रेशीमबागेतल्या स्मृती मंदिरात ते डॉ केशव बळिराम हेडगेवार यांना आदरांजली वाहतील. त्यानंतर दीक्षाभूमीलाही भेट देऊन ते आदरांजली वाहणार आहेत. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते नागपूरमध्ये माधव नेत्रालयाच्या विस्तार केंद्राची पायाभरणी होणार आहे. याठिकाणी ते नागरिकांना संबोधित करणार आहेत. प्रधानमंत्री नागपूरमधील सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस लिमिटेडच्या ड्रोनसाठीच्या धावपट्टी सुविधेचं उद्घाटन करतील.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी आकाशवाणीवरच्या ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधतील. या कार्यक्रमाचा हा १२० वा भाग आहे. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, वेबसाईट, प्रधानमंत्री कार्यालय, माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे यूट्यूब चॅनल आणि न्यूज ऑन एआयआर या ॲप वर या कार्यक्रमाचं थेट प्रसारण होईल.

आकाशवाणीवरून रात्री ८ वाजता प्रादेशिक भाषांमध्ये कार्यक्रमाचं प्रसारण होईल.

**<><><><><>**

वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व शाळांची वेळ सकाळच्या सत्रात करण्याचे निर्देश शिक्षण संचालक संपत सूर्यवंशी आणि शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दिले आहेत. त्यानुसार प्राथमिक शाळांसाठी सकाळी ७ ते ११.१५ आणि माध्यमिक शाळांसाठी सकाळी ७ ते पावणेबारा अशी वेळ निश्चित केली आहे.

**<><><><><>**

छत्तीसगडमध्ये सुकमा जिल्ह्यात आज पहाटे सुरक्षा दलाबरोबर झालेल्या चकमकीत १७ नक्षली ठार झाले. यामध्ये ११ महिलांचा समावेश आहे. ठार झालेल्यांपैकी एकाची ओळख पटली असून, त्याचं नाव जगदीश उर्फ बुधरा असं आहे. पोलिसांनी त्याच्यावर २५ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं.

केरलापार पोलीस स्थानकाच्या हद्दीतल्या जंगलात जिल्हा राखीव दल आणि केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या संयुक्त पथकानं काल रात्री नक्षली विरोधी मोहीम राबवली होती. या चकमकी दरम्यान सुरक्षा दलाचे ४ जवान किरकोळ जखमी झाले.

घटनास्थळावरून पोलिसांनी एके ४७, सेल्फ लोडिंग रायफल, रॉकेट लाँचर, ३०३ रायफल, बॅरल ग्रेनेड लाँचरसह मोठ्या प्रमाणात शस्त्र आणि दारूगोळा जप्त केला आहे.

**<><><><><>**

२००८ सालच्या दारात रोख रक्कम आढळल्याप्रकरणी पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश निर्मल यादव आणि इतर चार जणांची निर्दोष मुक्तता झाली आहे. १७ वर्षांनंतर चंदीगडच्या विशेष सी बी आय न्यायालयानं आज हा निकाल दिला. १३ ऑगस्ट २००८ रोजी झालेल्या खळबळजनक प्रकरणात यादव यांच्यावर १५ लाख रुपयांची लाच घेतल्याचा आरोप होता.

**<><><><><>**

म्यानमारमध्ये झालेल्या भूकंपातल्या बळींची संख्या एक हजाराच्या वर पोहोचली आहे. बचाव आणि शोधकार्यादरम्यान भुकंपामुळे कोसळलेल्या इमारतींच्या ढिगाऱ्याखालून आज आणखी मृतदेह बाहेर काढले गेले. आत्तापर्यंत १ हजार २ जणांचे मृतदेह सापडले आहेत.मृतांचा आकडा वाढण्याची शक्यताही तिथल्या प्रशासनानं व्यक्त केली आहे. सव्वा दोन हजारांहून अधिक जण जखमी झाले असल्याचं तिथल्या प्रशासनाच्या निवेदनात म्हटलं आहे.

या भुकंपामुळे म्यानमारच्या शासकीय तसंच निवासी इमारतींसह पायाभूत सुविधांचं मोठं नुकसान झालं आहे. भुकंपामुळे बंद पडलेली वीज, दूरध्वनी आणि इंटरनेट सेवा पुन्हा पूर्ववत करायचे प्रयत्न सुरू आहेत.
दरम्यान दक्षिण कोरियानं म्यानमारला आंतरराष्ट्रीय संस्थांमार्फत २० लाख अमेरिकी डॉलरच्या मदतीची घोषणा केली, तर संयुक्त राष्ट्रसंघानं ५० लाख अमेरिकी डॉलरची मदत दिली आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही अमेरिका मदत करण्यासाठी तयार असल्याचं म्हटलं आहे.

म्यानमारसह भुकंपाचा धक्का बसलेल्या थायलंडमधल्या बँकॉक परिसरासह इतर ठिकाणी आत्तापर्यंत ६ जणांचा भुकंपामुळे मृत्यू झाला तर २६ जण जखमी झाल्याची माहिती तिथल्या प्रशासनानं दिली. अद्यापही ४७ जण बेपत्ता असून बचाव आणि शोधकार्य सुरू असल्याचं तिथल्या प्रशासनानं कळवलं आहे.

**<><><><><>**

भूकंपग्रस्त म्यानमारच्या मदतीसाठी भारतानं उघडलेल्या ‘ऑपरेशन ब्रम्हा’ मोहिमे अंतर्गत १५ टन  मदत साहित्य घेऊन जाणारं पहिलं विमान आज सकाळी यांगून इथं पोहोचलं. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ता रणधीर जैस्वाल यांनी आज नवी दिल्ली इथं प्रसार माध्यमांना ही माहिती दिली. या मदत साहित्यात तंबू, ब्लँकेट, आवश्यक औषधे, ताडपत्री, स्लीपिंग बॅग्ज, जनरेटर सेट, सौर दिवे, स्वयंपाकघर संच आणि अन्न पॅकेट्स याचा समावेश असल्याचं ते म्हणाले. शोध आणि बचाव कर्मचारी आणि उपकरणं असलेली दोन विमानं,  ने पि ताव इथं  पाठवली जात आहेत. तसंच ८० सदस्यीय एनडीआरएफ शोध आणि बचाव पथक, रवाना होत  असल्याचं ते म्हणाले.

नौदलाची INS सावित्री आणि INS सातपुडा ही जहाजं यांगून कडे निघाली आहेत. त्यात ५० टनांहून अधिक मदत साहित्य असल्याची माहिती कमोडोर रघू नायर यांनी दिली.

**<><><><><>**

बिहारचे माजी मंत्री मोहम्मद इलियास हुसेन यांना सीबीआय न्यायालयानं ३ वर्षांची कैद आणि ३२ लाखांचा दंड सुनावला आहे. रांची

मधल्या २८ वर्ष जुन्या डांबर घोटाळ्यात ही शिक्षा झाली आहे. त्यांच्यासह आणखी ५ जण या प्रकरणी दोषी आहेत. इतर ७ जण निर्दोष सुटले आहेत.

<><><><><>

जम्मू काश्मिरमध्ये सुरक्षा दलांनी दहशतवाद्यांची शोध मोहिम आणखी तीव्र केली आहे. कथुआ जिल्ह्यात काल झालेल्या चकमकीत ४ पोलीस शहीद झाले होते आणि २ दहशतवादी ठार झाले होते. हे दोघे जैश ए मोहम्मदचे सदस्य आहे, अशी शक्यता आहे.

<><><><><>

व्हाईस ऑफ अमेरिका ही वृत्तसंस्था बंद करण्याचा डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाचा निर्णय अमेरिकन फेडरल न्यायाधीशांनी फेटाळून लावला आहे. हा निर्णय मनमानी कारभाराचं उदाहरण असल्याचं न्यायाधीश जेम्स पॉल ओटकन यांनी म्हटलं आहे. मात्र वृत्तसंस्थेचं प्रसारण पुन्हा सुरू करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले नाहीत. पण या न्यायालयाच्या या निर्णयामुळे बाराशे पत्रकार, अभियंते आणि इतर कर्मचारी सक्तीच्या रजेवर जाण्यापासून बचावले आहेत.

<><><><><>

आयपीएलमध्ये गुजरात टायटन्स विरुद्धच्या सामन्यात मुंबई इंडियन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. अहमदाबादमध्ये हा सामना सुरू आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा गुजरात टायटन्सनं ८ व्या षटकात बिन बाद ७२ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

मुंबईतले पोलीस उपायुक्त सुधाकर पठारे यांचं आज तेलंगणात अपघाती निधन झालं. ते प्रशिक्षणासाठी हैदराबादला गेले होते. देवदर्शनासाठी श्री शैलम इथून नागर कुर्नुलकडे जात असताना त्यांच्या गाडीची एका ट्रकसोबत धडक झाली. या अपघातात पठारे यांच्यासह त्यांच्या नातेवाईकाचाही मृत्यू झाला.

सुधाकर पठारे हे भारतीय पोलीस सेवेच्या २०११ च्या तुकडीतले अधिकारी होते. पठारे यांनी पंढरपूर, अकलूज, कोल्हापूर शहर आणि राजुरा यासह मुंबई महानगर क्षेत्रात विविध ठिकाणी काम केलं आहे.

**<><><><><>**

युक्रेनमध्ये डनिप्रो शहरावर रशियाने केलेल्या ड्रोन हल्ल्यात चार जणांचा मृत्यू झाला तर २१ जण जखमी झाले आहेत. काल रात्री उशिरा झालेल्या हल्ल्यात एक रेस्टॉरंट आणि अनेक निवासी इमारतींना आग लागल्याचं या प्रदेशाचे प्रमुख सेर्ही लिसाक यांनी सांगितले. पश्चिम बेल्गोरोड भागात युक्रेनच्या तीन ड्रोनना पाडण्यात आल्याची माहिती रशियाच्या संरक्षण मंत्रालयानं दिली आहे.

**//<><><><><>//**